# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. 0712-6465146/46 कार्यासन दु. क्र. 0712-6465145

E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website: rdtenagpur.org.in


क्र.तंशिस/प्राकाना/शीवि/MI Seat/2017/ 2033

दिनांक:- 20 JUL 2017

प्रति,

प्राचार्य/संचालक

सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी व पदवीका (अल्पसंख्याक दर्जा) संस्था

नागपूर.

विषय:- MI Seat Type अंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थांच्या निवेदनाबाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, शैक्षणिक वर्ष 2016-17 मध्ये आपल्या संस्थेत प्रवेशीत विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांना MI Seat Type मिळालेली आहे अश्या विद्यार्थ्यांना समाज कल्याण विभाग, नागपूर शिष्यवृत्ती मिळाली नसल्यामुळे विद्यार्थ्यांकडून संपुर्ण फी ची मागणी करीत आहेत व त्याशिवाय पुढील वर्षात प्रवेश देण्यास नकार देत असल्याबाबतच्या ब-याच तक्रारी विद्यार्थी व त्यांचे पालकाकडून या कार्यालयास प्राप्त होत आहेत.

सदरहू प्रकरणी आपणास कळविण्यात येते की, या कार्यालयाव्दारे समाज कल्याण विभाग, नागपूर यांना विचारणा केली असता त्यांनी सदरहू प्रकरणाबाबत समाज कल्याण विभाग, नागपूर यांनी मा.आयुक्त, समाज कल्याण, आयुक्तालय, पुणे यांचेकडे मार्गदर्शन मागितलेले आहे, सदर पत्राची प्रत सोबत जोडलेली आहे. मार्गदर्शन प्राप्त झाल्यानंतर याबाबत निर्णय घेण्यात येईल असे कळविलेले आहे. त्यामुळे सदर प्रकरणी समाज कल्याण विभागमार्फत अंतीम निर्णय होईपर्यंत विद्यार्थ्यांना व्दितीय वर्ष प्रवेशाकरीता तसेच 2017-18 प्रथम वर्ष प्रवेशीत विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क भरण्याबाबत सक्ती करण्यात येऊ नये व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.

सहपत्र:- वरीलप्रमाणे.

(गुलाबराव ठाकरे)

सहसंचालक

तंत्रशिक्षण वि.का., नागपूर